# प्रसिध्दीपत्र

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -०१ यांचे मार्फत **शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग इन्स्ट्रक्टर्स ॲण्ड स्टुडन्टस्** (GCC-SSD-CTC) **या दोनही परीक्षा दिनांक १४** फेब्रुवारी २०२३ ते दि. ०३ मार्च २०२३ **या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने** एकूण २८५ परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. सदर परीक्षांचे (मराठी, हिंदी ३० व ४० श.प्र.मि.) प्रवेशपत्रे परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर संस्था लॉगिनद्वारे दि. 21/०२/२०२३ पासून देण्यात आलेली आहेत.

संबंधित संगणक टंकलेखन संस्थाचालकांनी त्यांच्या संस्थेतील सर्व परिक्षार्थ्यांची प्रवेशपत्रे संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन शिक्का व स्वाक्षरीसह संबंधित परीक्षार्थ्यांना वितरीत करण्याची व्यवस्था करावी.

अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे सदर परीक्षेसाठी प्रवेशपत्र वितरीत केल्यानंतर विद्यार्थ्याचे स्वत:चे नाव, आडनाव, वडिलांचे नाव/ पतीचे नाव, आईचे नाव, विषय बदल, फोटो बदल, केंद्र बदल इ.कोणत्याही प्रकारची दुरुस्ती करुन दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर परीक्षेसाठी प्रविष्ठ विद्यार्थ्याच्या प्रवेशपत्रावरील फक्त स्पेलिंग दुरूस्ती असेल व विद्यार्थ्याचे नाव, वडिलांचे नाव/ पतीचे नाव, आईचे नाव, आडनाव यात बदल होत नसेल तरच परीक्षेपुर्वी तीन (०३) दिवस अगोदर म्हणजेच दि. 24/०२/२०२३ पर्यंत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयात (विद्यार्थ्याचा फोटो व ओळखपत्रासह) समक्ष येऊन दंड रु. २००/- आकारुन प्रवेशपत्रावर दुरूस्ती करुन घ्यावी.

सर्व परीक्षार्थ्यांनी त्यांची ऑनलाईन प्रवेशपत्रे आपल्या संगणक टंकलेखन संस्थेतून परीक्षेपूर्वी हस्तगत करावित **परीक्षा सुरू झालेनंतर कोणतीही दुरूस्ती करून दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.**

शैलजा 21/2/2023

**(शैलजा दराडे)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे -०१.**

**दिनांक :-** 21/ **०२/२०२३.**
**स्थळ :- पुणे**